# प्रकरण सातवे

# ‘समारोप’

## प्रकरण सातवे

# समारोप

साठोत्तरी मराठी कवितेचा विचार करत असताना कवितेच्या प्रांतात दलित कविता हा एक महत्त्वाचा प्रवाह निर्माण झाला. या आंबेडकरी दलित कवितेच्या आगमनाने मराठी काव्यप्रांताला एक नवे विश्व मिळाले. मुळात हा दलित कवितेचा प्रवाह १९६० नंतर उदयाला आलेला असला तरी अवघ्या एका दशकात या मराठी काव्य प्रांताच्या दिशा बदलल्या. अन्याय अत्याचाराला नकार देत दलित कविता विद्रोहांकीत होऊन इथल्या सांस्कृतिक, सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, धार्मिक गुलामगिरीवर प्रहार करू लागली. तिने मराठी कवितेच्या सौंदर्याचे व्याकरणच बदलून टाकले. ज्ञानेश्वरांच्यापासून प्राचीन मोक्ष कवितेला, केशवसूत, मार्क्सवाद्याच्या पुरोगामी कवितेला, तसेच मर्ढेकरांच्या नवकवितेला या कवितेने पुनर्मूल्यांकन अनिवार्य करून टाकले. सामाजिक जाणिवेची संकल्पना नव्याने तपासून घेतली. वास्तविक अनेक शतके दबलेला हा मूक भावनांचा आविष्कार होता. म्हणून त्यात विद्रोहाबरोबर नकारही ठासून भरलेला होता. या प्रत्येक शब्दांत आग होती, तसा डोळ्यात करूणेचा अश्रूही होता.

दलित कविता ही स्वातंत्र्याच्या वैफल्यातून निर्माण झालेली असली तरी मानवी मूल्ये जपताना दिसते. कारण जे भयावह, भयाण जीणे जो वर्ग जगला होता ते जगच वेगळे होते. ते अमंगळ जगणे संपवून आपले असे नवे जग या कवितेला निर्माण करायचे आहे. म्हणूनच ही कविता आपल्या अंधार युगातील भीषण, भयावह, वास्तव जीवनानुभवांची जाणीव करून देते, आणि तेव्हाच भविष्यकालीन जीवनाविषयीही दुर्दम्य आशावाद व्यक्त करते. या कवितेच्या निर्मितीमागे स्वातंत्र्याचे वैफल्य असले तरी दलित कविता ही अन्याय, अत्याचाराबद्दल फक्त आक्रोश करीत नाही तर ती प्रकाश युगात प्रवेश करते व आपल्या समाजाच्या उज्ज्वल भवितव्याचे, पुनर्मांडणीचे चित्र रेखाटते.

मूळात प्रस्थापित मराठी कविता आणि दलित कविता यांच्या निर्मिती जाणिवा, प्रेरणांमध्ये मोठा फरक आहे. डॉ. बाबासाहेबाच्या क्रांतीगर्भ विचारांचा वारसा सांगणारी ही कविता आंबेडकरांची लढाऊ प्रेरणा घेऊन आलेली आहे. म्हणजे दलित कवितेचा पिंडच मूळात लढाऊ आहे. चंद्र, चांदणे, शृंगारात रमण्यापेक्षा ती माणसांच्या वस्तीत जाते व माणसांची सुख दु:खे मांडते. मनुप्रणित व्यवस्थेने ज्यांना माणूसपण नाकारले

होते ती माणसे डॉ. बाबासाहेबाच्या प्रेरणेने बोलू लागली. हजारो वर्षांचाकाळोख दूर करून या अंधाराच्या यात्रेकरूना बाबासाहेबानी प्रकाशाची वाट दाखविली. त्यामुळे अनेक शतके मूका असणारा माणूस बोलू लागला. बाबासाहेबानी त्यांना विद्रोहाची भाषा दिली. त्यामुळे समाजातील वास्तवाला, जगाव्या, भोगाव्या लागणाऱ्या दु:ख, यातनेला शब्दरूप मिळाले आणि अनेक वर्षे वेशीबाहेर अवगुंठीत झालेल्या दु:खाचा, वेदनेचा स्फोट झाला. तो नकार घेऊन आला. याचे प्रत्यंतर १९६० नंतरच्या कवितेत दिसते. ही कविता मानसिक षंढत्वातून आलेली नव्हती तर तिला समाजाच्या असहाय्य वेदनेचे, मानवी मूल्यांचे आणि नवसृजनाचे भान होते. सर्वहारा माणसाच्या कल्याणासाठी नवी माणुसकीची मूल्ये रूजविण्याची तिच्यात आस होती. आणि म्हणूनच तिने विद्रोही रूप धारण केलेले आहे. 'शिका, संघटित व्हा, आणि संघर्ष करा' या बाबासाहेबानी दिलेल्या संदेशामुळे तळागाळातील समाजात नवचैतन्य संचारले. त्यांना आपल्या 'स्व'त्वाची जाणीव झाली. अन्यायकारी व्यवस्थेची आणि तिने लादलेल्या गुलामगिरीची जाणीव झाल्याने या समूळ व्यवस्थेलाच धिक्कारून ही कविता उभी राहते. राहिलेली दिसते.

१९२७ साली डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी चवदार तळ्याचा सत्याग्रह करून प्रथम समानतेचे तत्त्व प्रस्थापित केले. पण ही विषमता निर्माण करण्याचे मूळ मनुस्मृतीत आहे. त्यामुळेच बाबासाहेबानी मनुस्मृतीचे दहन करून टाकले. ही भारताच्या इतिहासातील क्रांतीकारी घटना होती. विषमतेला खतपाणी घालणाऱ्या धर्मग्रंथांची त्यानी चिकित्सा केली. धर्मग्रंथाने घालून दिलेले नियम, चालीरीती कशा फोल आहेत हे दाखवून दिले. या एकूण सर्व घटनांचा परिपाक १९८० नंतरच्या कवितेत येतो. साठोत्तरी कवितेपेक्षा ऐंशीच्या दशकात आलेल्या कवितेतून आंबेडकरी प्रेरणा आणि आंबेडकरी विचार अधिक सशक्तपणे आविष्कृत होवू लागलेला आहे. जागतीकीकरणाच्या रेट्यात सर्वहारा समाजाच्या समोर अनेक प्रश्नांचे वादळ घोंघावतआहे. जागतिकीकरण त्यातून आलेला चंगळवाद, वसाहतवाद, दहशतवाद आणि सांस्कृतिक प्रतिक्रांतीवाद या सर्व गोंधळात मानव्याचे मूल्य जोपासण्यासाठी ऐंशीच्या दशकातली दलित कविता नवनव्या वाटा चोखाळताना दिसते आहे. कारण माणुसपणाची नवनिर्मिती आणि त्याची जपणूक ही तिची जबाबदारी आहे.

आजच्या सहस्रकोत्तर दलित कवितेने प्रेरणा, प्रवृत्ती आणि प्रवर्तन तसेच आशय आणि अभिव्यक्तीच्या स्वरूपात पुढची पायरी गाठली आहे. साठोत्तरी कवितेतील

वेदना आणि नकाराची जागा दुसऱ्या पिढीतील कवितेत विधायक विद्रोहाने घेतलेली आहे. ती आंबेडकरांच्या तत्त्वज्ञानात्मक वैचारिकतेवर जास्त भर देणारी आहे. दुसऱ्या पिढीतील विधायक विद्रोहाची जागा ही या पिढीच्या कवितेत जुन्या मूल्यांना नाकारून नवीन मूल्यांच्या स्वीकाराने घेतल्याचे जाणवते. ही नवी मूल्ये अर्थातच बौद्ध संस्कृतीतून स्वीकारलेली आहेत. पहिल्या पिढीने भोगलेले दु:ख, वेदना या पिढीच्या कवितेतून आविष्कृत झाले तर, तिसऱ्या पिढीची कविता ही पहिल्या – दुसऱ्या पिढीच्या कवितेच्याच पातळीवर रेंगाळत असली तरी सांस्कृतिक व सामाजिक मूल्यांच्या बाबतीतील पाऊल पुढेटाकून ती दलितत्त्वाकडून बुद्धत्त्वाकडे वाटचाल करते आहे. वैचारिक स्पष्टता हे या पिढीचे वैशिष्ट आहे. केशव सूतापासून मार्क्सवादी विचारांच्या पहिल्या पिढीतील कवितेने स्वीकारलेल्या वैचारिक कुबड्या या पिढीतील कवितेने जाणीवपूर्वक फेकून दिल्या आहेत, व बुद्धांच्या सखोल ज्ञानावर ती चिंतन करताना दिसते आहे.

फुले–आंबेडकर कालीन स्वत्वाच्या प्रस्थापनेसाठी केलेला संघर्ष साकारणारा विद्रोही भूतकाळ आणि सांस्कृतिक प्रतिक्रांती, जागतिकीकरण, खाजगीकरण आणि चंगळवादी आदर्शविहीन समाजव्यवस्थेने बरबटलेला वर्तमानकाळ हा या कवितेमध्ये सातत्याने येताना दिसतो आहे. या दोन कालखंडातील संस्कृतीतील संघर्षाचे चित्रण या पिढीच्या कवितेतून येत आहे. या कवितेचा बदललेला रूपबंध, नवनवी मिथके शोधण्याची धडपड हे याचेच फलित आहे. पहिल्या पिढीच्या कवितेची प्रवृत्ती ही विरोधाला विरोध करण्याची आक्रमक होती. समोर जे जे वाईट, अन्यायकारक आहे त्याला नष्ट करून टाकायचे अशी आक्रमकता या पिढीच्या कवितेत दिसून येते. दुसऱ्या पिढीच्या कवितेमध्ये ही आक्रमकतेची धार थोडी कमी झालेली आहे. जे–जे अन्यायकारी आहे त्याला नष्ट करावेच पण हे करत असताना मानवी मूल्य जपले जावे असे या विद्रोहाचे व आक्रमकतेचे स्वरूप होते. पहिल्या आणि दुसऱ्या पिढीच्या वैचारिकतेचा अर्क घेऊन तिसऱ्या पिढीची कविता तयार झालेली आहे. या पिढीच्या कवितेत स्वागतशीलता आहे. ही कविता समस्त मानवमुक्तीसाठी नवसृजनाची निर्मिती अपेक्षिते. हे नवसृजन निर्माण करण्यासाठी अन्यायाला, पारंपरिक रुढी मूल्यांना विरोध करून नवीन मूल्यांची प्रस्थापना करते. या कवितेतील विद्रोहाला वैचारिकतेची धार मिळाल्यामुळे ती अधिक तीव्र झालेली आहे. डॉ. बाबासाहेबाची वैचारिकता व बुद्धांच्या समतेचे तत्त्व घेऊन ती अन्यायाला विरोध करते. समाजातील सैतानी वृत्तींचा निषेध करते. ती जितक्या प्रखरतेने अन्यायी गोष्टींवर हल्ला करते तितक्याच तीव्रतेने

स्वत:चे कठोर आत्मपरिक्षणही करते. आपल्यातील ढोंगीपणावर हल्ला करते. म्हणजेच समाजातील वाईटावर बोलत असतानाच ती आपल्यातील वाईटावर सुद्धा बोलते. या कवितेचे महत्त्वाचे वैशिष्ट म्हणजे ती स्वत:वर बोलत असताना कोणताही आडपडदा ठेवत नाही.

स्वातंत्र्योत्तर काळातील कविता ही शाहिरी काव्याची पंरपरा पाठीवर घेऊन आंबेडकरांच्या प्रेरणेतून उदयास आली. या पिढीच्या कवितेचा पाया घडविण्यात आंबेडकरी शाहीरीचे मोठे योगदान आहे. १९२० सालापासून डॉ. आंबेडकर भारताच्या राजकीय, सामाजिक पटलावर अवतरले. त्यामुळे दलित समाजात नवे मन्वंतर घडून आले. तेच या शाहिरांच्या शाहिरीतून आविष्कृत झाले. डॉ. आंबेडकरांनी संविधानाच्या माध्यमातून दलितांना मिळवून दिलेली स्वतंत्रतेची सनद आणि मानवी मूल्यांचा केलेला अंगीकार, त्यातून उपेक्षित दलित वर्गात निर्माण झालेले आत्मभान, दलितांच्या आत्मजागृतीसाठी उभारलेली चळवळ आणि भारताच्या सामाजिक सांस्कृतिक बदलांची केलेली भक्कम पायाभरणी यामुळेच तळागाळातील माणूस जागा झाला. त्याने सर्वार्थाने स्वत:लाही या चळवळीत झोकून दिले. हीच चळवळ गतीमान करण्यासाठीच आंबेडकरी शाहिरीची निर्मिती झाली. या शाहिरीने पारंपरिक 'गणपती' स्तवन नाकारले व ती आंबेडकरी स्तवन गाऊ लागली. आंबेडकरांनी दिलेल्या प्रचंड आत्मविश्वासातून ही शाहीरी इथल्या अन्यायकारी वर्ण व्यवस्थेला भिडली. आपल्या अंतरीक क्रांतीकारी विद्रोहाचे या व्यवस्थेला हादरे दिले. डॉ. आंबेडकरांनी पेटविलेली सर्वकष क्रांतीची मशाल, वादळवाऱ्यात, पाऊसात देखील विझणार नाही असा प्रखर आत्मविश्वास या शाहिरांनी व्यक्त केला. गोपाळबाबा वलंगकर, किसन फागू बनसोडे यांच्यानंतर पांडूरंग वनमाळी, शाहिर अढांगळे, शाहिर, श्रीधर, शाहिर घेगडे, वामनदादा कर्डक इत्यादी आणि इतर शाहीरांनी शाहीरी लिहून व्यवस्थे विरोधीची चीड आणि निषेध, नकार नोंदविला. शाहीरीची परंपरा घेऊन आलेली स्वातंत्र्योत्तर काळातील कविता ही प्रस्थापित कवितेपेक्षा प्रकृतीने भिन्न होती. कारण प्रस्थापित मराठी कवितेला पाण्यासाठी प्राण कंठात येण्याचा अनुभव नव्हता, सांगावा घेऊन फिरण्याची कळ नव्हती. लाकडे फोडल्याचे घट्टे नव्हते की, भाकरी चाकरी साठीचे आया-बहिणींच्या अब्रुवरील अतिक्रमण तिने सोसले नव्हते. म्हणूनच प्रस्थापित कवितेपेक्षा प्रस्तुत कविताही सर्वार्थाने वेगळी आहे. ही कविता जरी स्वातंत्र्याच्या वैफल्यातून निर्माण झालेली असली तरी ती प्रकाश पूजक आहे. डॉ. बाबासाहेबांच्या वैचारिकतेचे

अधिष्ठान तिला मिळाले असल्यानेच ती शैक्षणिक, सामाजिक, राजकीय, धार्मिक क्षेत्रांतील अन्यायावर हल्ला करते व स्वत:चे परिक्षणही करते.

दुसऱ्या पिढीच्या कवितेने वेशीच्या आत प्रवेश करून अनेक वर्षे सडत, कुडत किड्या मुंगीचे जीवन जगणाऱ्या समाजाच्या व्यथा वेदना ती मांडू लागली. या वेदना दु:ख निर्माण करणाऱ्या धर्माला आणि सामाजिक व्यवस्था निर्माण करणाऱ्या संस्कृतीच्या रक्षकांना आपल्या अवनतीचे आणि गुलामीचे कारण विचारू लागली. दुसऱ्या पिढीमध्ये प्रामुख्याने दया पवार, वामन निंबाळकर, त्र्यंबक सपकाळे, प्रल्हाद चेंदवणकर, ज.वि. पवार, अर्जुन डांगळे, यशवंत मनोहर इत्यादी कवींनी कवितेला विद्रोहाची धार दिली. या पिढीच्या कवितेचे महत्त्वाचे वैशिष्ट्य हे की, ही कविता प्रामुख्याने विद्रोहावर भर देते.

पूर्वसूरींच्या जहाल विद्रोहाचा वारसा घेऊनच तिसऱ्या पिढीची कविता आली. दलित कविता आवर्तात सापडलेली आहे. अशी जी ओरड मधल्या काळात झाली हे काही अंशी खरे असले तरी तिसऱ्या पिढीची कविता पाहता हे जाणवत नाही. तिसऱ्या पिढीची कविता ही आंबेडकरी विचाराने प्रगत आणि प्रगल्भ झाल्याने तिने अभिव्यक्तिच्या नव्या वाटा चोखाळल्या आहेत.. म्हणूनच मराठीच्या मध्यवर्ती मुख्य धारेत तिचे स्थान अढळ आहे. जसे सामाजिक वास्तव बदलते आहे, तसे स्पृशा-स्पृश्यतेचे स्वरूपही बदलते आहे. ही अस्पृश्यता वरवर दिसत नसली तरी चेहरा बदलून छुप्या पद्धतीने चालूच आहे. हा चेहरा लपवलेला बुरखा फाडण्याचे काम या पिढीतल्या कवितेने केलेले आहे. ही कविता विद्रोहाचे जहाल रूप प्रस्तुत न करता या विद्रोहाला आंबेडकरी तत्त्वज्ञानात्मक वैचारिकतेची जोड देते. त्यामुळे या विद्रोहाचे स्वरूप हे वैचारिक होते. ही कविता अन्यायी व्यवस्थेविरोधी नकार नोंदवते, तिचा निषेध करते. त्याचवेळी नव्याच्या निर्मितीसाठी नवीन रचनाही करते. या पिढीच्याकवितेला आंबेडकरी विचारांची बैठक आहे तसेच बुद्धाच्या अहिंसेचा सोसही आहे. म्हणूनच ही कविता मानवी मूल्ये प्राणपणाने जपते. आंबेडकरांच्यापासून ती थेट बुद्धांच्यापर्यंत जाते व मानवतेशी आपले गहिरे नाते सांगते. तिसऱ्या पिढीच्या कवितेच्या केंद्रस्थानी माणूस असल्याने माणसाच्या मंगलासाठीच ती उभी आहे.

तिसऱ्या पिढीत प्रामुख्याने भुजंग मेश्राम, वाहरू सोनावने, विनायक तुमराम, माधव सरकुंडे, राम दातोंडे, अरूण काळे, लहू कानडे, महेंद्र भवरे, मधू गवई, शिवाजी सोनवणे, लोकनाथ यशवंत, बबन लोंढे, केतन पिंपळापूरे, भाऊ पंचभाई, जावेदकुरेशी,

कृष्णा निर्मळे, डी.बी. रत्नाकर यांची कविता प्रामुख्याने येते. या पिढीचे दुसरे वैशिष्ट्य असे की, या पिढीत बाबासाहेबाच्या विचाराने प्रेरीत होऊन स्त्रियाही लिहित्या झाल्या. त्यात ज्योती लांजेवार, सुरेखा भगत, प्रज्ञा लोखंडे, प्रतिभा राजानंद, कुसुम अलाम, कुमुद पावडे, सुषमा अंधारे, मल्लिका शेख, संध्या रंगारी इ. कवयित्रींची कविता येते. या सर्वच कवयित्रीच्या कवितेमध्ये पारंपरिक व्यवस्थेविरोधी चीड तर आहेच पण स्त्री म्हणून तिला भोगावे लागणारे दास्य प्रखरतेने आलेले आहे. एकंदरीत फुले-आंबेडकरी प्रेरणेने निर्माण झालेल्या स्त्रियांच्या कवितेचे या प्रवाहात महत्त्वाचे स्थान आहे.

कवी रत्नाकरांची कविताही फुले-आंबेडकरी प्रगल्भ तत्त्वज्ञानावर आधारलेली आहे. ती कार्यकर्त्यांची असल्याने आंबेडकरी चळवळीतील चढउतार त्यांनी स्वत: अनुभवलेले आहेत. स्वत: अस्पृश्य कुटुंबात जन्मल्याने त्यांना सोसावे लागलेले दु:ख जसे त्यांच्या कवितेत येते, तसे या सर्व गोष्टीबरोबर स्वत:चेही आत्मपरिक्षण येते. आंबेडकरी चळवळीचे यशापयश आणि आपल्याच माणसांनी केलेला घात यावर त्यांची कविता चिंतन करते, बुद्ध, फुले, आंबेडकर यांच्या विचारांना ती शरण जाते. कवी रत्नाकर हे कवितेच्या प्रांतात नवनव्या वाटा चोखाळण्यात अग्रेसर आहेत. कवी रत्नाकरांची 'हॉटेल माझा देश' मधील कविता ही त्यांच्या मनात दबलेल्या भावनांचा उत्स्फूर्त उद्रेकच आहे. रत्नाकरांचा हा काव्यसंग्रह पहिला वहिला असला तरी, नवखेपणाची खूण त्यात कोठेही आढळत नाही. स्वत: दलित असूनही त्यांची कविताही दलित जाणिवेच्या पलिकडे जाते. ही दोन महत्त्वाची वैशिष्ट्ये या संग्रहातील कवितेची आहेत. म. फुले, डॉ. बाबासाहेब यांचा वारसा जपणारा हा कवी आपला कविता संग्रह हॉटेली कामगारांच्या दु:ख वेदना आणि अगतिकतेला अर्पण करतो. क्रांतीबा फुल्यांचा वैचारिक वारसा प्रामाणिकपणे चालवताना कवी रत्नाकर दिसतात. कवी रत्नाकरांच्या कवितेत अस्वस्थ करणारी घालमेल आहे. अस्वस्थतता आहे. या अवस्थतेचे, घालमेलीचे उत्तर शोधण्याची धडपड तितकीच विलक्षण आहे. ही घालमेल त्यांच्या अखंड चिंतनशीलतेतून जन्माला आलेली आहे.

घरंदाज गरिबी, अनाथ, कोणत्यातरी कारणावरून पळून आलेले, दुसरे काम न जमणारे, बाई, बाटली, मटका या नादातले, आणि शिक्षण घेत काम करणारे असे सर्व प्रकारचे लोक हॉटेलात कामगार म्हणून एकत्र येतात. अशा ठिकाणी कवी स्वत: कामगार म्हणून आहेत. मात्र त्यांनी या हॉटेलचा गरजेपुरता वापर घेतला नाही. तर तिथे काम करत असणाऱ्या कामगारांच्या सुखदु:खांशी ते समरस झाले. तिथली

परिस्थिती, जगले जाणारे जीवन तमाम लोकांच्यासमोर आणले. हॉटेल व्यवसायात काम करत असताना त्यांना आलेले अनुभव हे अत्यंत बोलके वाटतात. यातूनच कवीची सामाजिक बांधिलकी स्पष्ट होते. कवी रत्नाकरांच्या या सर्व हॉटेलच्या अनुभवात असहाय्य यातना आहेत. हॉटेल जीवनाबद्दलची उबग आहे. हॉटेल कामगारांच्या व्यथा वेदनांचा आक्रोश आहे. भांडवलदारांविरोधीचा संताप आहे. पण हा सारा संताप अक्रस्ताळेपणापासून फार दूर आहे. एकीकडे असा या जगण्याबद्दल नकार नोंदवत असतानाच हॉटेलचे उपकारही ते विसरत नाहीत. हॉटेल लाईनमध्ये जपल्या जाणाऱ्या माणुसकीचे सूक्ष्म निरीक्षण करत असताना आपली म्हणून सामाजिक बांधिलकीची उत्कटता त्यांनी दाखविलेली आहे. रत्नाकरांनी हॉटेल लाईनमधील वैफल्यग्रस्तता जितक्या प्रखरतेने व्यक्त केलेली आहे, तितक्याच किंबहूना त्याहीपेक्षा जास्त प्रखरतेने हॉटेल लाईनमध्ये कोणाला न दिसलेल्या, न जाणवलेल्या सामाजिक समतेलाही समाजासमोर आणण्याचा स्तुत्य प्रयत्न केलेला आहे. स्वतंत्र भारताची स्थिती कवीला सतत अस्वस्थ करते आहे. जात, धर्म,पंथ यांना स्तनासारखे जपणाऱ्या या खंडप्राय देशाला फोडून त्याला हॉटेलसारखा आकार द्यावा. कारण हॉटेलमध्ये जात, धर्म, पंथ काहीच नसते. म्हणूनच देशाला हॉटेलचा आकार देण्याची जगावेगळी इच्छा कवीने व्यक्त केली आहे. हॉटेलमध्ये काम करणाऱ्या तरुण कामगारांचे नैतिक अध:पतन झालेले आहे. हे कवी नाकारत नाही. उलट आपणसुद्धा यापासून अलिप्त नसल्याचे प्रांजळपणे कबुल केलेले आहे. हा प्रांजळपणा अंतर्मुख करणारा आहे. वास्तवात जरी आपल्याला एखादी गोष्ट मिळत नसेल तर ती कल्पनेतून मिळविण्याचा आचरटपणा आपण करतो. ह्या आचरटपणाबद्दलही रत्नाकर स्पष्ट कबुली देतात.

प्रेम हा काव्याचा स्थायीभाव असल्याने या संग्रहातही प्रेम कविता येते. कवीच्या या हॉटेल देशातील प्रेम हे व्यवहारी जगातील प्रेमासारखा हळूवारपणा किंवा प्रेमभंगामुळे आलेला आक्रस्ताळेपणा घेऊन न येता या प्रेमाला वास्तवतेचा खरबरीत स्पर्श झालेला जाणवतो. कवी रत्नाकरांची प्रेम कविता ही हॉटेलच्या भाषेत बोलते. या प्रेमाला हॉटेलमधल्या कोंडलेपणाची व एकाकीपणाची एक वेगळा 'सल' आहे. या कवितासंग्रहातून कवी स्वत:च्या धुमसणाऱ्या व्यक्तिमत्त्वाचा शोध घेतो.

कवी रत्नाकरांचा हा पहिला वहिला कवितासंग्रह असला तरी तो प्रगल्भ जाणिवेतून व दीर्घ चिंतनातून आलेला आहे. रत्नाकरांनी आपल्या अभिव्यक्तिसाठी काही शब्दांची नवीनच निर्मिती केलेली आहे. त्यांच्या उपमा, प्रतिमांचे सामर्थ्यही खूप

मोठे आहे. रत्नाकरांची कविता ही नवीनच पण दाहक अनुभव घेऊन येते. हॉटेलची संस्कृती आणि भारतीय संस्कृती यात तुलना करण्याचा त्यांनी प्रयत्न केलेला आहे. एकीकडे बारक्याला जन्म देणारी संस्कृती तर दुसरीकडे तिथली जाती-पातीला गाढव लावणारी संस्कृती. या दोन्हींमध्ये समतेचे केंद्र असलेले हॉटेल कवीला महत्त्वाचे वाटते. विद्रोह आंबेडकरी दलित कवितेचा स्थायीभाव असला तरी रत्नाकरांच्या कवितेत तो 'स्वीकारात्मक विद्रोहाचे' रूप घेऊन येतो. तेव्हा या कवितेचे वाङ्मयीन मूल्य ही उच्च प्रतीचे ठरते.

कवी रत्नाकर हे वैविध्यपूर्ण लेखन करणारे कवी आहेत. विशषत: कवितेच्या क्षेत्रातील 'गझल' हा काव्यप्रकारही त्यांनी हाताळलेला आहे. 'लक्तरांची गझल' या संग्रहात त्यांची गझल संग्रहीत झालेली आहे. मराठीमध्ये गझल हा प्रकार प्रामुख्याने सुरेश भटांनी समाजाभिमुख केला. प्रियाराधनेसाठी लिहिल्या जाणाऱ्या या प्रकाराला भटांनीच सामाजिक रूप दिले. तोच मार्ग कवी रत्नाकरांनी अनुसरलेला आहे. मुळात रत्नाकर हे बाबासाहेबाच्या चळवळीतील सक्रीय कार्यकर्ता असल्याने त्यांच्या या गझलांमध्ये चळवळ आलेली आहे. आंबेडकरी चळवळीत काम करणारा कार्यकर्ता हा समाजापासून आपली नाळ तोडूच शकत नाही. रत्नाकरांनी ही चळवळ अगदी विद्यार्थी दशेपासूनच अनुभवलेली आहे. त्यातील आक्रमकता, स्वीकाराहार्यता, नव्याच्या प्रस्थापनेसाठीचा टोकाचा आपलेपणा व अन्यायी, वाईट गोष्टींचा सर्वनाश करण्याची धडपड त्यांनी अनुभवली आहे. उपेक्षित अस्पृश्यांना सोसावे लागणारे चटके त्यांनी सोसलेले आहेत. म्हणूनच रत्नाकरांची गझल या अन्यायकारी व्यवस्थेचा निषेध नोंदवित निर्माण होते. रत्नाकरांच्या गझलांचा अभ्यास करत असताना एक गोष्ट ध्यानात येते ती ही की, त्यांची गझल ही स्वत:चा अगदी उघडेपणाने शोध घेते. चळवळीच्या फसलेपणावर भाष्य करते. हे करत असतानाच काही नवे मार्गही सूचवते.

डॉ. बाबासाहेबाच्या चळवळीतला कार्यकर्ता हा सर्वच बाजूंनी फाटका आहे. तरीही तो आपल्या समाजाच्या उन्नतीसाठी लढण्यास नेहमी सज्ज असतो. तो आपल्या समाजाशी अभिमानाने आपले नाते सांगतो. हा आपले नाते सांगण्यातला प्रामाणिकपणा आणि समाजावर अन्याय, अत्याचार करणाऱ्या गोष्टीच्या विरोधातील आक्रमकपणा कवीच्या या गझलेत प्रकर्षाने प्रकट झालेला आहे. रत्नाकरांनी स्वत:चे कठोर आत्मपरिक्षण या गझलांच्या माध्यमातून केलेले आहे. या गझलेचा विचार करत असताना, डॉ. बाबासाहेबानी जो मानव मुक्तीचा लढा दिला. हजारो वर्षे अंधार

असणाऱ्या वस्तीत प्रकाशाचे दिवे पेटविले, अंधारात चाचपडणाऱ्या दलित जनतेला प्रकाशाचे तेज दिले, ते तेज आणि डॉ. आंबेडकरांचे तत्त्वज्ञान आत्मसात करून त्यांनी प्रथम इथल्या अन्याय, अत्याचाराला विरोध केला ही संस्कृती आपली नाही हे कळल्यावर क्रांतीसाठी जी पिढी सज्ज झाली, त्या अखंड संघर्षातून ही कविता जन्माला आलेली आहे. ही कविता क्रांतीची आणि क्रांतीतून मुक्तीची भाषा बोलते. कवी रत्नाकरांची गझल ही सुद्धा क्रांतीचीच भाषा बोलते. ही क्रांती सर्वकष माणसांच्या उन्नतीसाठीची आहे. ही कविता सूर्यवंशी असल्याने ती प्रकाश पूजते. तिचा केंद्रबिंदू माणूस हाच राहिलेला आहे. याही संग्रहात हळूवार प्रेमभावना व्यक्त झालेली आहे. मात्र हे प्रेम रंगेल नसून त्याला सामाजिक वास्तवाचे भान आहे. आपल्या मार्गदात्या सर्वच मुक्तीदात्यांच्याबद्दलचा आदरभाव या गझलांतून व्यक्त झालेला आहे. ज्यांनी भाषा दिली, शब्द दिले त्या शब्दांच्या निर्मात्यांना कवी प्रणाम करतो. या महामानवाचा आदर्श घेऊन कवी नव्या समाजनिर्मितीची अपेक्षा करतो, व त्यासाठी जून्या रूढी परंपरांवर प्रहार करतो. रत्नाकरांच्या कवितेला जून्याची मोडतोड व नव्याची निर्मिती अपेक्षित आहे. रत्नाकरांनी जे पाहिले, अनुभवले त्यालाच त्यांनी शब्दरूप दिलेले आहे. म्हणूनच त्यांची कविता ही त्यांच्या मनातील वादळाचे शब्दरूप आहे.

हजारो वर्षे फाटके असणाऱ्या, फाटक्या, तुटक्या लक्तरांत राहणाऱ्या समाजाचे समाजवास्तव या गझलांतून रत्नाकरांनी मांडलेले आहे. देशातील आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, धार्मिक व्यवस्थेवर कवीने ताशेरे ओढलेले आहेत. तसेच दलित चळवळ, तिचे झालेले विघटन, नेत्यांचा नाकर्तेपणा यावरही रत्नाकरांनी मुक्तपणे भाष्य केलेले आहे. माणसाला केंद्र माणणारी ही गझल माणसांवर होणाऱ्या अन्यायावर बेधडक बोलते. कवीची अन्यायाविरोधी बोलण्याची भाषा ही परखड वाटत नसली तरी, तिला फुले-आंबेडकरी विचारांचा भक्कम पाया आहे. म्हणूनच ती उरबडवेपणा करताना दिसत नाही. हेच या गझलांचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे.

ऐंशी नंतरची कविता ही आशय विषयाच्या बाबतीत नवनव्या वाटा चोखाळताना दिसते. आपली स्वत:ची अशी निश्चित वेगळी ओळख ही कविता करून देते. ऐंशीनंतर कविता लिहिणारे कवी हे स्वत:ची अशी एक ठोस भूमिका मांडताना दिसतात. नवसृजनाची अपेक्षा करत असताना ही कविता माणसाचे मूल्य काळजीपूर्वक जपताना दिसते. प्रस्थापित चौकटीच्या उरले सुरलेपणाला ही कविता नष्ट करू इच्छिते. गौतम बुद्ध, म. फुले, डॉ. बाबासाहेबाना अपेक्षित असणाऱ्या नवसमाजाच्या

निर्मितीसाठी सर्वकष उभी ठाकते. अरविंद सुरवाड्यांनी 'अस्मितादर्श'च्या अंकात सहस्रकोत्तर आंबेडकरी कवितेचा विचार करताना म्हटले होते की, 'साठोत्तरी कवितेत विद्रोहाची प्रवृत्ती अधिक होती. त्यात ऐंशी नंतरच्या कवितेत प्रवर्तक जाणीवांची भर पडत गेली.' या प्रवर्तक जाणीवा ज्या आहेत त्या जाणीवा बौद्ध संस्कृतीतून आलेल्या व आंबेडकरी विचाराने सशक्त झालेल्या आहेत. या जाणिवांची कविता कवी रत्नाकरांनीही लिहिलेली आहे. याच्या खुणा त्यांच्या कवितेत ठिकठिकाणी आढळतात. गौतमबुद्धांच्या अहिंसेचा स्वीकार केलेली रत्नाकरांची कविता ही व्यवस्थेविरोधी बोलताना अहिंसक वाटत असली तरी तिने नकार, विद्रोह यांचा त्याग मात्र केलेला दिसत नाही.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जीवन, त्यांचे विचार यावरील गाढ निष्ठा हा या कविता संग्रहांचा गाभा आहे. म्हणूनच रत्नाकरांची कविता ही आजवरच्या कवितेसारखी व्यवस्थेवर प्रहार करून थांबत नाही. तर आजच्या परिवर्तनाच्या चळवळीचा विश्वासघात करणाऱ्या संधीसाधू झुंडशाहीला बळी जाऊन समाजाचे वाटोळे करणाऱ्या नेतृत्त्वाला आपले लक्ष करते. सामाजिक, राजकीय, शैक्षणिक,सांस्कृतिक जीवनातले नैतिक अध:पतन वैयक्तिक जीवनातही सर्वदूर पसरलेले पाहून कवीचे मन व्यथित होते. ती व्यथितता त्यांनी आपल्या कवितेत मांडलेली आहे. निव्वळ ही व्यथा मांडून कविता थांबत नाही तर, या नैतिक आराजकाला शह देऊन नव्या अनुशासन पर्वाची सुरुवात करावयास हवी याची स्पष्ट कल्पना देते. याच जाणीवेत या कवितेचे क्रांतीकारकत्व दडलेले आहे. या नव्या अनुशासन पर्वाची सुरुवात ही कविता स्वत:पासून करते. म्हणून या कवितेत संयम आणि नियमन यांचा प्रभाव जाणवतो. म्हणूनच रत्नाकरांची कविता ही समाजातील सैतानी वृत्तीला गाडण्यासाठी सैतानाच्या खांबावर दगड मारून सैतानी वृत्तीला शह देते. कवी रत्नाकरांची आत्मजाणीव, त्यांचे चिंतन या कवितेमध्ये जाणवते. ढासळत जाणारी विहिर, वठत जाणारे वडाचे झाड,देवळांचा जिर्णोद्धार या विचारांतून होणारी समाजाची जी घसरण आहे त्या घसरणीवर रत्नाकरांची कविता स्पष्टपणे बोलते. अगोदरच्या दोन्ही कविता संग्रहापेक्षा त्यांच्या 'सैतानाच्या खांबावर' या संग्रहातील कवितेत विविधता आढळते. 'आत्मकथा' सारखी कविता लिहून कवी रत्नाकरांनी आपल्यासुद्धा चांगल्या वाईटपणाचे परिक्षण करून घेतलेले आहे, व काही गोष्टी प्रांजळपणे कबूल केल्या आहेत. हे या संग्रहातील कवितेचे वेगळेपण आहे. शब्दांचे अवडंबन न माजवता मनात येणारी भावना सरळ ते शब्दबद्ध करतात. या वेळी मनामध्ये कोणताही किंतू ते

ठेवत नाहीत. परखड भाषाशैली, योग्य आणि मोजक्याच शब्दांचा वापर, लोकसाहित्याचा अनुबंध वापरून वाचकाला अंतर्मुख करणारी विषय मांडणी यामुळे ही कविता सशक्त झालेली आहे. कवी नामदेव ढसाळांच्या कवितेशी नाते सांगणारी ही कविता असली तरी त्यांच्या कविते इतकी दाहकता रत्नाकरांच्या कवितेत नाही. मात्र परिवर्तनाच्या चळवळीतील पुढचे पालन म्हणून या कवितेकडे पाहता येते. म्हणून या संग्रहातील कवितेचे मोल मोठे आहे.

कवी रत्नाकरांच्या कवितेचे मूल्यमापन करत असताना प्रथम त्यांच्या संग्रहांच्या शीर्षकांकडे पहावे लागते. त्यांच्या संग्रहांची व कवितांची शीर्षके ही समर्पक व आशयघन असलेली दिसतात. आंबेडकरी समाजाला इथल्या परंपरावादी धर्माने जी वर्तणूक दिली, जी गुलामगिरी लादली त्या गुलामीतून निर्माण झालेला विद्रोह या सर्वांच्या मिश्रणातून ही शीर्षके तयार झालेली आहेत. या शीर्षकांच्या मागे भयानक भूतकाळ आहे. तसा पराक्रमाचा तेजस्वी इतिहासदेखील आहे. 'हॉटेल माझा देश' हे शीर्षक खूप काही सांगून जाते. हॉटेल कामगारांचे एक अनोखे विश्व या शीर्षकातून समोर येते. या देशात असणारी अस्पृश्यता, जातियता, वर्णव्यवस्था या सर्वांना या ठिकाणी थारा नाही. हॉटेल कामगारांच्या दु:खाबरोबरच इथली वर्गीय जाणीवही यातून दृगोचर होते. 'लक्तरांची गझल' हे ही शीर्षक अर्थपूर्ण असे आहे. आंबेडकरी समाजाची दैन्यावस्था सांगणारे हे शीर्षक या देशाच्या एकूण व्यवस्थेलाच वाचकांच्यासमोर आणते. आंबेडकरी चळवळीतला कार्यकर्ता हा दारिद्र्यात वाढलेला आहे. तरीही आपली सामाजिक बांधिलकी मान्य करून तो माणसाचे मूल्य जपताना दिसतो. यांचे निर्देशन या शीर्षकातून होते. 'सैतानाच्या खांबावर' हे शीर्षकही इथल्या नैतिक आराजकाचे प्रतीक म्हणूनच येते. आपल्या देशातील राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक, सांस्कृतिक व्यवस्थेतील नैतिक आराजकाचा पट या शीर्षकातून समोर येतो. रत्नाकरांच्या अर्पणपत्रिकाही आपल्या तेजस्वी इतिहासाची आणि असिम त्यागाची साक्ष देणाऱ्या आहेत. त्यामुळे या कवितेचे मूल्य वाढलेले आहे. प्रामुख्याने मुक्त छंदातली रत्नाकरांची ही कविता चंद्र, चांदण्यात न रमता सामाजिक आशय घेऊन येते. तिला म. फुल्यांपासून बाबासाहेबांच्या पर्यंत भक्कम अशी वैचारिकता लाभलेली आहे.

रत्नाकरांच्या कवितेत येणारी व्यक्तिचित्रणे ही त्यांच्या सशक्त शब्द सामर्थ्यामुळे प्रभावशाली होऊन येतात. त्यांची अभिव्यक्ती ही निधडी असल्याने अन्यायावर भाष्य

करताना ते कुठेही कचरत नाहीत. समर्थ भाषेच्या माध्यमातून, संवादातून त्यांनी भीषण, भयावह असे सामाजिक वास्तव मांडलेले आहे. कवी रत्नाकरांची प्रतिभा नवे प्रश्न निर्माण करते. त्यातूनच त्यानी नव्या वाटा चोखाळलेल्या आहेत. बौद्ध संस्कृतितील नवी मिथके त्यांनी शोधलेली आहेत. रत्नाकरांनी समाजवास्तव जसे कवितेतून मांडलेले आहे तसाच आपला स्वत:चाही कसून शोध घेतलेला आहे. कठोर आत्मपरिक्षण केलेले आहे.

कवी रत्नाकरांनी कवितेच्या रचनाबंधाबद्दल कोणताही विधिनिषेध बाळगलेला दिसत नाही. कधी ते अभंगाचा वापर करतात तर कधी बालगीत, तर कधी त्यांची कविता लोकसाहित्याच्या भाषेत बोलते. रूपबंधापेक्षा ही कविता आशयाला महत्त्वाचे स्थान देते. म्हणूनच या कवितेचे वाङ्मयीन मूल्य मोठे आहे.

कवी रत्नाकरांची कविता ही मानवी मूल्यांच्या प्रस्थापनेसाठी निर्माण झालेली असल्याने ती नवसृजनाची अपेक्षा करते. तेव्हाच ती अन्यायालाही गाडू पाहते. म्हणून ही कविता माणसाची कविता आहे. अखंड मानवतेशी तिचे नाते घट्ट आहे. या कवितेचे वाङ्मयीन मूल्य तपासत असताना ही कविता पूर्णपणे वाङ्मयीन निकषांवर उतरते. म्हणूनच दलित नव्हे तर एकूण मराठी मध्यवर्ती कवितेत सुद्धा या कवितेचे वाङ्मयीन मूल्य हे श्रेष्ठ दर्जाचेच आहे. यामुळेच कवी रत्नाकरांच्या कवितेने या समग्र प्रवाहात आपला एक वेगळा ठसा उमटविलेला आहे.

------

# संदर्भ ग्रंथ सूची


| | | | |
|---|---|---|---|
| १) | आत्राम उषाकिरण | : | 'म्होरकी', (कवितासंग्रह) |
| २) | आलाम कुसूम | : | 'रान आसवांचे तळे', (१९९८) |
| ३) | अंधारे सुषमा | : | 'शापित', 'मीरा' |
| ४) | कानडे लहू | : | 'टाचा टिभा', सुगावा प्रकाशन,पुणे. |
| ५) | काळे अरूण | : | 'सायरनचे शहर', सत्यजित प्रकाशन, नाशिक, प्र.आ. १९९७. |
| ६) | काळे अरूण | : | 'रॉक गार्डन', प्रबोधन प्रकाशन, मुंबई, प्र.आ. १९८५. |
| ७) | कार्व्हालो सिसिलिया | : | 'उन्मेश', युवदर्शन प्रकाशन, मुंबई, प्र.आ.१९८५. |
| ८) | कार्व्हालो सिसिलिया | : | 'अंतर्यामी', अभिरूची प्रकाशन, मुंबई, प्र.आ.१९९८. |
| ९) | कार्व्हालो सिसिलिया | : | 'सूर्य किरणात आला', डिंपल प्रकाशन, वसई, प्र.आ.२००३. |
| १०) | किरवले कृष्णा | : | 'समग्र लेखक बाबुराव बागूल', प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्र.आ.२००२. |
| ११) | किरवले कृष्णा | : | 'दलित चळवळ आणि साहित्य', मॅजिक प्रकाशन, पुणे, प्र.आ.१९९६. |
| १२) | कुलकर्णी मदन | : | 'दलित जाणिवेच्या कवितेतील सूर्यप्रतिमा', गवळी प्रकाशन, कोल्हापूर, प्र.आ.१९९३. |
| १३) | कुरेशी जावेद | : | 'बएत', सुगावा प्रकाशन, पुणे. |
| १४) | कांबळे उल्हासिनी | : | 'हरवलेला किनारा' |
| १५) | कुंभोजकर ललिता | : | 'दलित कविता एक दर्शन', प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्र.आ. १९८४. |
| १६) | खंडेराव हरीश | : | 'आंबेडकरी कवितेचे अंतरंग', जागर प्रकाशन, मुंबई, १९८१. |

१७) चेंदवणकर प्रल्हाद : 'ऑडिट', अभिनव प्रकाशन, मुंबई, प्र.आ. १९७६.

१८) जाधव रा.ग. : 'निळी पहाट', श्रीविद्या प्रकाशन, पुणे, प्र.आ.१९७८.

१९) डांगळे अर्जुन : 'छावणी हालती आहे', कर्मवीर प्रकाशन, नागपूर, १९७७.

२०) ढसाळ नामदेव : 'गोलपिठा', निलकंठ प्रकाशन, पुणे, द्वि.आ.१९९५.

२१) ढसाळ नामदेव : 'मुर्ख म्हाताऱ्याने डोंगर हलवले', मागोवा प्रकाशन, पुणे, प्र.आ.१९७५.

२२) ढसाळ नामदेव : 'तुही इयत्ता कंची ?' आंबेडकर प्रबोधिनी, मुंबई, प्र.आ.१९८१.

२३) ढसाळ नामदेव : 'खेळ', प्रास प्रकाशन, मुंबई, प्र.आ. १९८३.

२४) ढसाळ नामदेव : 'मी मारले सूर्याच्या रथाचे सात घोडे', २००५.

२५) त्रिभूवन दीपक : 'खोलखदानी', मधुश्री प्रकाशन, पुणे, १९९२.

२६) निंबाळकर वामन : 'गावकुसाबाहेरील कविता', प्रबोधन प्रकाशन, नागपूर.

२७) पवार दया : 'कोंडवाडा', मेहता प्रकाशन, पुणे, प्र.आ.१९८२.

२८) पावडे कुमुद : 'अंत:स्फोट', आनंद प्रकाशन, औरंगाबाद, प्र.आ. १९८०.

२९) पाटील म.सू. : 'दलित कविता', लोकवाङ्मयगृह प्रकाशन, मुंबई, १९८९.

३०) फडके भालचंद्र : 'दलित साहित्य वेदना आणि विद्रोह', श्रीविद्या प्रकाशन,पुणे, प्र.आ.१९७७.

३१) बागूल बाबुराव : 'दलित साहित्य आजचे क्रांतविज्ञान', बुद्धिष्ट पब्लिर्शिग हाऊस, पुणे, प्र.आ.१९८०.

३२) मनोहर यशवंत : 'आंबेडकरवादी मराठी साहित्य', भीमरत्न प्रकाशन, नागपूर, १९९१.

३३) मनोहर यशवंत : 'उत्थानगुंफा', कॉन्टीनेन्टल प्रकाशन,पुणे, प्र.आ. १९७७.

३४) मेश्राम योगेंद्र : 'दलित साहित्य उद्‌गम आणि विकास', गणेश प्रकाशन, नागपूर, १९९८,

३५) मेश्राम भुजंग : 'ऊलगुलान', साकेत प्रकाशन, औरंगाबद, प्र.आ. १९९०.

३६) यशवंत लोकनाथ : 'आता होऊन जाऊ द्या', मुक्तछंद प्रकाशन, चंद्रपूर, प्र.आ. १९८९.

३७) रंगारी संध्या : 'आघात', शब्ददान प्रकाशन, नांदेड, प्र.आ. १९९२.

३८) लांजेवार ज्योती : 'दिशा', निखिल प्रकाशन, नागपूर, प्र.आ. १९८२.

३९) लोखंडे प्रज्ञा : 'अंत:स्थ', मानसन्मान प्रकाशन, पुणे, प्र.आ. १९९३.

४०) शेंडे सुगंधा : 'विरतं धुकं', खेमराव हिरेखण

४१) शेख मल्लिका : 'वाळूचा प्रियकर'

४२) सरकुंडे माधव : 'मनोगत', देवयानी प्रकाशन, यवतमाळ.

४३) सपकाळे त्र्यंबक : 'सुरुंग', अस्मितादर्श प्रकाशन, औरंगाबाद, प्र.आ. १९७६.

४४) साबळे सुरेश : 'युगाचे हुंदके', (संपा.) संदेशप्रकाशन, बुलढाणा, प्र.आ. १९९८.

४५) सुर्वे नारायण : 'ऐसा गा मी ब्रह्म', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, द्वि.आ. १९७१.

४६) सुर्वे नारायण : 'माझे विद्यापीठ', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, प्र.आ. १९६२.

४७) सुर्वे नारायण : 'जाहिरनामा', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, प्र.आ. १९६६.

४८) सोनवणे वाहरू : 'गोधड', रवीराज प्रकाशन, पुणे, प्र.आ. १९८७.


------

## मासिके नियतकालिके यांची सूची


१) शब्दांकुर, त्रैमासिक, जुलै/ऑगस्ट/सप्टेंबर, २००४.

२) करवीर काशी, १५ एप्रिल, २००५.

३) करवीर काशी, ८ एप्रिल, २००५.

४) दै. संचार, इंद्रधनु पुरवणी, ४ जुलै, १९९३.


------